**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्राला संबोधित करणार

- राष्ट्रीय मतदारदिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम

- राज्यातल्या ४३ पोलिस अधिकाऱ्यांना विविध शौर्य पदक जाहीर

- भंडारा जिल्ह्यातल्या आयुध निर्माण कंपनीत झालेल्या स्फोटात मरण पावलेल्यांच्या कुटुंबांना कंपनीकडून ५० लाख रुपयांची मदत

**आणि**

- ज्येष्ठ साहित्यिक न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्राला संबोधित करणार आहेत. या संदेशाचं थेट प्रसारण संध्याकाळी ७ वाजता आकाशवाणीवरुन होणार आहे. राष्ट्रपतींच्या भाषणानंतर त्याचा इंग्रजी अनुवाद आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन प्रसारित केला जाईल. साडेनऊ वाजता आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन प्रादेशिक भाषांमधला अनुवाद प्रसारित केला जाईल.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यात सर्वत्र चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. सर्व सरकारी निमसरकारी आस्थापनांमधे तसंच शाळा महाविद्यालयं आणि सामाजिक संस्था संघटनांमधे उद्या तिरंगा ध्वज फडकावण्यात येईल.

प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यात सर्वत्र उत्साहाचं वातावरण आहे. विविध आकाराचे कापडी, प्लॅस्टिक आणि इतर साहित्याने तयार केलेल्या राष्ट्रध्वजाच्या प्रतिकृती बाजारात विक्रीला आहेत. **मुंबईसह** आजूबाजूच्या परिसरातल्या ऐतिहासिक वारसा स्थळांवर तिरंगी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक, महापालिका मुख्यालय, गेटवे ऑफ इंडिया, उच्च न्यायालय, मुंबई विद्यापीठ यावर विद्युत रोषणाई केली आहे. तसंच, **पालघरच्या** जिल्हाधिकारी कार्यालयावर तिरंग्याची विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

'संविधान स्वीकृतीची ७५ वी वर्षपूर्ती आणि लोकसहभाग' यावर उद्याच्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात भर देण्यात आला आहे. इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियंतो उद्याच्या संचलन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनानिमित्त संचलनात सहभागी राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, आदिवासी अतिथी आणि चित्ररथ कलाकारांशी प्रधानमंत्र्यांनी आज अनौपचारिक संवाद साधला. राष्ट्रीय एकात्मता आणि विविधतेवर यावेळी त्यांनी भर दिला.

**<><><><><>**

सुजाण मतदारच आपल्या लोकशाहीला बळकटी देत असतात असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी म्हटलं आहे. आज देशभरात १५ वा राष्ट्रीय मतदार दिन आज देशभरात उत्साहात साजरा होत आहे. यानिमित्त नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाला त्यांनी संबोधित केलं.

या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते निवडणुका सुरळितपणे पार पडण्याच्या दृष्टीने उत्कृष्ट आणि अनुकरणीय कामगिरी केलेल्या राज्य आणि जिल्हा अधिकाऱ्यांचा सर्वोत्तम निवडणूक पद्धती पुरस्कार देऊन गौरव केला गेला. याअंतर्गत महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला, तसंच मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या महाराष्ट्रातल्या दोन जिल्ह्यांनाही पुरस्कारानं गौरवलं गेलं.

या कार्यक्रमात भारत निवडणूक आयोगाच्या इंडिया व्होटस २०२४-अ सागा ऑफ डेमोक्रेसी आणि बिलिफ इन बॅलट : ह्युमन स्टोरीज शेपींग इंडियाज २०२४ इलेक्शन या दोन पुस्तकांचंही प्रकाशन झालं, तसंच निवडणूक आयोगाच्या माहितीपट मालिकेच्या प्रचारफितीचं लोकार्पणही केलं गेलं.

राज्यातही सर्वच जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय मतदार दिनानिमीत्त मतदार जागृतीपर आणि पुरस्कार कार्यक्रमांचं आयोजन केलं गेलं. राज्याचा मुख्य कार्यक्रम **पुणे** इथे झाला. या निमित्तानं नागरिकांना मतदार शपथ दिली गेली, तसंच निवडणूक प्रक्रियेच्या वेगवेगळ्या टप्प्याअंतर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठीचे राज्यस्तरीय पुरस्कारही प्रदान केले गेले.

**सांगलीमध्ये** मतदान जनजागृती रॅलीचं आयोजन केलं होतं. यावेळी मतदारजागृतीपर स्पर्धांमधल्या विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिकं देऊन गौरवलं गेलं.

**हिंगोलीत** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मतदार जागृती रांगोळी स्पर्धेचं आयोजन केलं होतं. परभणीतही शालेय विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली काढली गेली.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या मुख्य सोहळ्यात पोलिस, गृहरक्षक दल, अग्निशमन, आणि नागरी सेवांसह इतर सुरक्षा सेवांमधल्या ९४२ कर्मचाऱ्यांना विविध पदकं प्रदान केली जाणार आहेत. यापैकी, ९५ कर्मचाऱ्यांना आपल्या

अतुलनीय शौर्याबद्दल शौर्य पदकांनी सन्मानित केलं जाईल. १०१ कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदकं तर ७४६ कर्मचाऱ्यांना उल्लेखनीय सेवा पदकं बहाल केली जाणार आहेत.

राज्यातल्या एकूण ४३ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त पुरस्कार जाहीर झाले आहेत. हवाई दलातले स्क्वाड्रन लीडर प्रथमेश डोंगरे यांना वायुसेना शौर्य पदक जाहीर झाला आहे. याशिवाय कॉर्पोरल विकी पहाडे यांना मरणोत्तर वायुसेना शौर्य पदक मिळणार आहे.

रविंद्र कुमार सिंगल, दत्तात्रय कारळे, सुनील फुलारी आणि रामचंद्र केंडे या पोलीस अधिकाऱ्यांना राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक जाहीर झालं आहे. याशिवाय ३९ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट सेवेसाठी पुरस्कार मिळाला आहे. त्यात संजय दराडे, विरेंद्र मिश्रा, आरती सिंग, चंद्र किशोर मीना, दीपक साकोरे, राजेश बनसोडे, सुनिल तांबे, ममता डिसुझा, धर्मपाल बनसोडे, मधुकर सावंत, राजेंद्र कोते, रोशन यादव, अनिल लाड, अरुण डुंबरे, नाजिर नासिर शेख, श्रीकांत तावडे, महादेव काळे, तुकाराम निंबाळकर, आनंदराव म्हस्के, रविंद्र वानखेडे, सलीम गनी शेख, तुकाराम आव्हाळे, रामभाऊ खंडागळे, संजय चोबे, सय्यद इक्बाल हुसेन सय्यद मथार हुसेन, अयुब खान अकबर मुल्ला यांचा यात समावेश आहे.

याशिवाय कारागृह सेवेतल्या ५ जणांना उत्कृष्ट सेवेसाठी पुरस्कार जाहीर झाले आहेत. त्यात विवेक झेंडे, अहमद मनेर, गणेश गायकवाड, तुळशीराम गोरवे यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या स्वयंसाह्यता समूहाच्या ११ महिलांना दिल्लीत प्रजासत्ताक दिनाचं संचलन पाहण्यासाठी विशेष आमंत्रण आहे. दीप्ती गायकवाड,

सानिका वालेकर, अनघा जाधव, मनिषा वगरे, श्रेया चवेकर, अक्षता पंगेरकर, साक्षी थोरे, मनस्वी भडवळकर यांना संचलन पाहण्याची संधी मिळाली आहे. याबाबत सानिका वालेकर यांनी आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या.....

**होल्ड बाईट वालेकर**

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यातल्या आयुध निर्माण कंपनीत झालेल्या स्फोटात मरण पावलेल्यांच्या कुटुंबांना ५० लाख रुपयांची मदत देण्याचं कंपनी प्रशासनानं जाहीर केलं आहे. तसंच कुटुंबातल्या एकाला नोकरी देण्याचं आश्वासन कंपनी प्रशासनानं दिलं आहे. दरम्यान, या प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल, असं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगांवकर यांच्या पार्थिव देहावर छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. चपळगांवकर यांचं आज पहाटे निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. साहित्य, कला, राजकीय, सामाजिक, प्रसारमाध्यमं, विधी आणि न्याय, उद्योग, वैद्यकीय, प्रशासन आदी क्षेत्रातील मान्यवरांनी चपळगांवकर यांचं अंत्यदर्शन घेऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

८० च्या दशकात चपळगावकर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद पीठाचे न्यायाधीश म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. १९९९ साली न्यायाधीशपदावरून निवृत्त झाल्यानंतरही ते साहित्य क्षेत्रात अखेरपर्यंत सक्रीय राहिले. वर्धा इथं झालेल्या ९६ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. माजलगाव इथं झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनासह विविध साहित्य संमेलनांची अध्यक्षपदं त्यांनी भूषवली.

अभिरुचीयुक्त आणि अभ्यासपूर्ण लेखनासाठी ओळखले जाणारे न्यायमूर्ती चपळगांवकर यांनी अनंत भालेराव-काळ आणि कर्तृत्व, स्वामी रामानंद तीर्थ-कर्मयोगी संन्यासी, कहाणी हैदराबाद लढ्याची, अशी अनेक  पुस्तकं लिहीली. मराठवाडा साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार, अमेरिकेतल्या महाराष्ट्र फाऊंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार, अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी चपळगावकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासभाड्यात आजपासून १४ पूर्णांक ९५ शतांश टक्के वाढ करण्यात आली आहे. हकीम समितीने निश्चित  केलेल्या सूत्रानुसार ही भाडेवाढ करण्यात आल्याचं सांगण्यात आलं आहे. त्यानुसार साध्या बसचं भाडं ६ किलोमीटर प्रति टप्प्यासाठी ११ रुपये, जलद सेवा बससाठी ६ किलोमीटर प्रति टप्प्यासाठी ११ रुपये, रात्र सेवा बस ११ रुपये, निम आराम १५ रुपये, विनावातानुकूलीत शयन आसनी १५ रुपये, विनावातानुकूलीत शयनयान १६ रुपये, शिवशाही साठी ६ किलोमीटर प्रति टप्प्यासाठी १६ रुपये भाडे आकारलं जाणार  आहे.

एसटी ची भाडेवाढ ही जनतेची लूट असल्याची टीका काँग्रेसचे ज्येष्ठ विजय वडेट्टीवार यांनी नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना केली आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत मतदार यादीतील मतदारांपेक्षा जास्त मतदान झाल्याच्या काँग्रेसच्या आक्षेपाला निवडणूक आयोगानं उत्तर दिलेलं नाही, याविरोधात आपण न्यायालयीन लढाई लढू, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं. ते आज नागपूर मध्ये वार्ताहरांशी बोलत होते.

निवडणूक आयोगानं विधानसभेच्या निवडणुकी दरम्यान मतदार याद्यांमध्ये घोटाळा केल्याचा आरोप प्रोफेशनल काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रवीण चक्रवर्ती यांनी केला आहे. ते आज मुंबई इथं पत्रकार परिषदेत बोलत होते.

<><><><><>

मतदार दिनाच्या पार्श्वभूमीवर विधानसभा लोकसभा निवडणुकीतल्या निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणाली विरोधात चंद्रपूर जिल्हा आणि शहर काँग्रेस कमिटीनं आज सकाळी चंद्रपूर इथं आंदोलन केलं.

<><><><><>

मुंबई दहशतवादी हल्ल्यातला महत्त्वाचा आरोपी तहव्वूर राणा याचा भारताकडे प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाला आहे. राणा यानं भारताकडे प्रत्यार्पण करण्याविरोधात दाखल केलेली पुनर्विचार याचिका अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावली आहे.

<><><><><>

यवतमाळ जिल्ह्यातल्या  उमरखेड इथं शाळेची बस झाडावर आदळून झालेल्या अपघातात एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला आहे. यात काही विद्यार्थी जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//